**नियमित दिवाणी मुकदमा क्र.९८/२०१५ मधील नि.४० खालील आदेश**
**(जगन्नाथ तुकाराम माने वगैरे–६ *विरुध्द* रामचंद्र तुकाराम माने वगैरे–२)**
**(CNR–MHSN090005002015)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे कथनाप्रमाणे वादीनी प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा अग्रहक्क–खरेदीचा होवून मिळणेकरिता, निरंतर ताकीद व वाटपाचा केला आहे. प्रतिवादीनी नि.२६ कडे कैफियत व ताकीद अर्जास म्हणणे दिले असून कलम १० मध्ये वाद मिळकतीचे घर मिळकतीसह पूर्वीच तोंडी वाटप झाले आहे असे कथन केले आहे. परंतु अनावधानाने प्रतिवादी क्र.१ हे वयोवृध्द आजारी इसम असलेने या तोंडी वाटपाचे कथनाप्रमाणे वादी–प्रतिवादी नं.१ चे निश्चित हिस्सेबाबत कैफियतीमध्ये नमूद (Locate) करणेचे राहून गेले आहे. सबब प्रतिवादी क्रं.१ चा तोंडी वाटपाप्रमाणे आलेला हिस्स्याचे better Particular Locate करणेचे दृष्टीने कैफियत कलम १० नंतर कलम १० अ घालून त्याखाली दावा कलम १ मधील गट नं.८९३ मधील क्षेत्राचे वर्णन, वहिवाटी, हातनकाशा व अनुषंगिक कथनांची नियोजित दुरुस्ती प्रतिवादीने मागितलेली आहे. तसेच पुढे गट नं.८९१, ९५३, ८९५ व १११७ या कमी क्षेत्राच्या असल्याने त्यांचेत पृथ्थक वहिवाट करणे अशक्य असल्याने त्या वादी–प्रतिवादी यांचेत सामाईक ठेवलेबाबतच्या कथनांची नियोजित दुरुस्ती प्रतिवादीने मागितलेली आहे.

३. त्यानंतर कैफियत कलम १३ नंतर कलम १३अ वाढवून त्यामध्ये प्रतिवादी कथन करत असल्याप्रमाणे ५० वर्षापुर्वी वाटप झालेले नाही या निर्णयाप्रत मे.न्यायालय आल्यास गट नं. ८९३ मधील पैकी १/३ हिस्सा उत्तर बाजूचे, ओढ्या लगतचे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना खुषखरेदीने कब्जेवहिवाटीने दिलेला पाच आणे चार पै. क्षेत्र प्रतिवादी क.१ यांचे हिस्सेस वाटपात देणेत यावे अशी व यास अनुषंगिक कथने करुन नियोजित दुरुस्ती मागितलेली आहे. प्रतिवादींचे कथनाप्रमाणे, सदर दुरुस्तीमुळे कैफियतीत कोणताही मुलभुत बदल होत नाही. वादीवर कोणताही अन्याय होणार नाही. याउलट दावामिळकतीचे better particulars देणेबाबत व तोंडी वाटप कसे झाले होते याबाबत कथने करणे आवश्यक आहे. तसेच, सदर दुरुस्ती वादी प्रतिवादींना अंतिम निर्णय मिळणेचे दृष्टीने गरजेची आहे. सबब प्रतिवादींचा कैफियत दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा.

४. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे आपले म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीचे कथनाप्रमाणे, अशा स्वरुपाची दुरुस्ती करणेचा प्रतिवादींना कोणताही हक्क व अधिकार नाही. या दुरुस्तीव्दारे प्रतिवादी त्रुटी भरुन काढणेचा प्रयत्न करीत आहेत. याकामी मूळ कैफियत व प्रतिवादी मागत आहेत ती दुरुस्ती या परस्पर विरोधी बाबी दिसत आहेत. त्यामूळे अर्ज नामंजूर करावा.

५. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादीनी प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा अग्रहक्क–खरेदीचा, निरंतर ताकीद व वाटपाचा केलेला आहे. वादी यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र. १ कडून बेकायदेशीररित्या दावामिळकतीतील हिस्सा खरेदी घेतल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादी यांनी कैफियतीतील कलम १० मध्ये दावामिळकतीचे वादी क्र.२, ३, ५, ६ यांचे पुर्वहक्कदार, प्रतिवादी क्र.१ व गावातील पंचासमक्ष वाद मिळकती व इतर मिळकतींचे वाटप झाल्याचे व त्याप्रमाणे वहिवाटी असल्याचे कथन केलेले आहे. सदर कथने शाबीतीची जबाबदारी प्रतिवादी यांची आहे. प्रतिवादी वैकल्पिक मागणीप्रमाणे खरेदीपत्रातील क्षेत्र प्रतिवादी क्र.१ चे वाटपात असल्याचे व त्याप्रमाणे त्यांनी विक्री केल्याचे कथन शाबीत करणेची जबाबदारी वादी यांची आहे. सबब प्रतिवादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे कैफियतीतील मुळ कथनांना कोणतीही बाधा येत नाही अगर कैफियतीचे स्वरुपात बदल होत नाही. तसेच या दुरुस्तीमुळे वादींचे हक्कांना कोणतीही बाधा येणार नाही. प्रस्तुतकामी दि.१२.०४.२०१८ रोजी मुद्दे निश्चित करणेत येवून प्रस्तुत काम चौकशीस नेमलेले आहे. दरम्यान प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिलेला आहे. यावरुन प्रतिवादीने विलंबाने अर्ज दिलेला आहे हे स्पष्ट होते. तथापि दाव्याचे स्वरुप, वादी यांच्या दाव्यातील मागण्या पाहता, प्रतिवादीने त्याचे कैफियतीत मागितलेल्या नियोजित दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नसून त्याबाबत योग्य तो पुरावा सादर करणेची वादीस संधी मिळणार आहे.सबब या सर्वाचा विचार करता, प्रतिवादीचा अर्ज दंडासह मंजूर करणेच्या निष्कर्षास प्रस्तुत न्यायालय पोहोचले आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन आदेश खालीलप्रमाणे–

**:: आदेश ::**

१. प्रतिवादी यांचा नि.४० कडील अर्ज दंडासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दंड रक्कम रु.५००/– वादींना द्यावी.

३. वादी यांना दंड रक्कम दिलेनंतर प्रतिवादी यांनी अर्जात मागितलेली दुरुस्ती विहीत मुदतीत करुन घ्यावी व नियमाप्रमाणे कैफियतीची दुरुस्त प्रत दाखल करावी.

स्वाक्षरी/–

**तासगांव.** **(श्रीमती एस.एस. मांजरेकर)**

**दि. २६.०४.२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**